# महादूत जनबिंदू

नाशिक
शनिवार १३ जून २०२६
पाने : ४
अंक : पहिला
किंमत : ३.००/-
आर एन आय. नं : MHMAR/26/A3622
www.mhdu.in

MHDU News चे अधिकृत वृत्तपत्र | वर्ष - पहिले (२०२६ ) | संपादक: विशाल सं भदाणे


# अखेर गोकुळ गीते यांची माघार; नाशिकच्या राजकारणात नवा ट्विस्ट, चर्चांना उधाण

## दराडे-गीते लढतीकडे लागले होते सर्वांचे लक्ष; समजूत, बैठका आणि राजकीय प्रयत्नांनंतर गीते यांनी घेतला माघारीचा निर्णय

**नाशिक | प्रतिनिधी (१२/०६/२०२६)**

नाशिकच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा विषय ठरलेले गोकुळ गीते यांनी अखेर निवडणुकीतून माघार घेतली आहे. दराडे विरुद्ध गीते अशी रंगतदार लढत होणार आणि त्याचा निकाल काय लागणार याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले असतानाच या राजकीय समीकरणाला अनपेक्षित वळण मिळाले आहे.

गोकुळ गीते यांना माघार घेण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू होते. अखेर गुरुवार, ११ जून २०२६ रोजी या प्रयत्नांना यश आले आणि गीते यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला.

गीते यांची समजूत काढण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा 'संकटमोचक' म्हणून ओळखले जाणारे गिरीश



महाजन आणि शिवसेनेचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी थेट गोकुळ गीते यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी शिक्षणमंत्री दादा भुसे, आमदार सुहास कांदे तसेच इतर पदाधिकारीही उपस्थित होते. या बैठकीत गोकुळ गीते यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

विशेष म्हणजे, गोकुळ गीते यांचे बंधू गणेश गीते यांनीही पहिल्या दिवसापासून वारंवार समजूत घालण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. मात्र, सुरुवातीपासूनच गोकुळ गीते यांनी निवडणूक लढविण्याची भूमिका कायम ठेवत विविध प्रस्तावांना नकार दिला होता. शेवटच्या टप्प्यात झालेल्या चर्चांनंतर त्यांनी माघार घेण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, गोकुळ गीते यांच्या माघारीच्या निर्णयामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची भावना दिसून आली. अनेक कार्यकर्त्यांनी थेट गिरीश महाजन आणि उदय सामंत यांच्यासमोर गोकुळ गीते यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. "एकच वादा, गोकुळ दादा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यकर्त्यांनी गीते यांनी निवडणूक लढवावी, अशी भूमिका ठामपणे मांडल्याचे पाहायला मिळाले. गोकुळ गीते यांच्या माघारीनंतर नाशिकच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. गीते यांनी माघार नेमकी कोणत्या कारणामुळे घेतली? त्यांच्यावर राजकीय दबाव होता का? की पक्षीय एकजूट आणि भविष्यातील राजकीय समीकरणांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला? अशा विविध चर्चांना सध्या जोर आला आहे.

दराडे-गीते संघर्षाची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असतानाच गीते यांच्या माघारीमुळे नाशिकच्या राजकारणात नवा अध्याय सुरू झाला असून, या निर्णयाचे दूरगामी परिणाम काय होणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नाशिकमध्ये हृदयद्रावक दुर्घटना!

## गंगापूर धरणात बुडून ४ जणांचा मृत्यू; तीन चुलत भावंडांसह तरुणीचा दुर्दैवी अंत

**नाशिक (११/०६/२०२६) :**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरण परिसरात रविवारी घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत चार जणांचा बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन चुलत भावंडे आणि एका २१ वर्षीय तरुणीचा समावेश असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश गोतरणे (१६), साहिल गोतरणे (१६), निखील गोतरणे (१६, सर्व रा. सावरगाव) आणि मयुरी जाधव (२१, रा. तळेगाव अंजनेरी) यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. सावरगाव येथील गोतरणे कुटुंबाने धोंड्याच्या जेवणासाठी नातेवाईकांना आमंत्रित केले होते. दुपारच्या जेवणानंतर मयुरी जाधव हिने गंगापूर धरणाचा फुगवटा पाहण्याचा आग्रह धरला. त्यानंतर ती इतर पाच जणांसह धरण परिसरात गेली



सुरुवातीला सर्वजण कमरेएवढ्या पाण्यात खेळत

होते. मात्र, पाण्याची खोली आणि खड्ड्यांचा अंदाज न आल्याने एक जण बुडू लागला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात इतरही पाण्यात अडकले. एका मोठ्या मुलाने एका मुलीचा जीव वाचवला, मात्र मयुरी जाधव आणि तीन मुलांना वाचवता आले नाही. घटनेची माहिती मिळताच गावातील तरुणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. शासकीय यंत्रणा पोहोचण्यापूर्वीच स्थानिकांनी बोट व इतर साधनांच्या मदतीने शोधमोहीम राबवून चौघांचे मृतदेह बाहेर काढले. या घटनेनंतर सावरगाव आणि परिसरातील ग्रामस्थांनी धरण परिसरात मोठी गर्दी केली होती. मृतांचे पार्थिव जिल्हा शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले.

### गाळ उपशामुळे तयार झाले खोल खड्डे?

स्थानिकांच्या मते, गंगापूर धरणात यापूर्वीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. धरणातील गाळ उपशाच्या कामांमुळे काही ठिकाणी १० ते १५ फूट खोल खड्डे निर्माण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. या खड्ड्यांमुळे पर्यटकांना पाण्याच्या खोलीचा अंदाज येत नसल्याने जीवितहानीच्या घटना घडत आहेत.

दररोज हजारो पर्यटक गंगापूर धरण परिसराला भेट देतात. मात्र, सुरक्षिततेच्या उपाययोजना अपुऱ्या असल्याची तक्रार स्थानिकांकडून करण्यात येत आहे. सावरगाव ग्रामपंचायतीने धरण परिसरात सुरक्षारक्षक नेमण्याची आणि पर्यटकांकडून शुल्क आकारून सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्याची मागणी संबंधित विभागाकडे केली आह





# गोदातीरावर सिंहस्थाचा शुभारंभ; जयघोषात ध्वजस्तंभ शिलान्यास संपन्न

**नाशिक |** (१२/०६/२०२६) आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणात औपचारिक सुरुवात झाली. रामतीर्थ येथील गंगा-गोदावरी पंचकोठी पुरोहित संघाच्या वतीने गुरुवारी सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. हजारो भाविक, साधू-संत, महंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने संपूर्ण गोदातीर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

**'हर हर महादेव', 'जय श्रीराम', 'गंगा गोदावरी की जय' आणि 'भारत माता की जय'**च्या घोषणांनी रामतीर्थ परिसर दुमदुमून गेला. धार्मिक परंपरा आणि श्रद्धेचा संगम अनुभवण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

सोहळ्यावेळी बोलताना मंत्री गिरीश महाजन यांनी आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी राज्य शासन आणि प्रशासन युद्धपातळीवर तयारी करत असल्याचे सांगितले. सुमारे १२ कोटींहून अधिक भाविक नाशिकमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. मागील कुंभमेळ्यात कोणतीही मोठी अनुचित घटना घडली नव्हती, यावेळीही सुरक्षा आणि व्यवस्थापनाबाबत विशेष खबरदारी घेतली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी गेल्या अनेक दशकांत न झालेली व्यापक मोहीम राबविण्यात आली असून, नदीकाठावरील अतिक्रमणे हटविण्याचे कामही पूर्णत्वास जात असल्याची माहिती त्यांनी दिली. सिंहस्थाच्या निमित्ताने नाशिकच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जाणार असून, शहराचा कायापालट घडवून आणण्याचा निर्धार शासनाने व्यक्त केला.

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांनी सिंहस्थाचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, दुष्प्रवृत्ती, अहंकार, मत्सर, मोह आणि द्वेष यांचा त्याग करून मानवतेचा स्वीकार करणे हेच खरे गोदास्नान आहे. धर्मध्वज हा केवळ धार्मिक परंपरेचे प्रतीक नसून मानवता, पर्यावरण, विज्ञान आणि अध्यात्म यांना जोडणारा दुवा असल्याचे त्यांनी नमूद केले, संजयदास महाराज यांनी धर्मध्वजाच्या प्राचीन परंपरेचा उल्लेख करत हा शिलान्यास भावी सिंहस्थाच्या भव्य आयोजनाचा पाया असल्याचे सांगितले.

या ऐतिहासिक सोहळ्यास जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज, मंत्री गिरीश महाजन, आमदार सीमा हिरे, डॉ. राहुल ढिकले, देवयानी फरांदे, महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, विविध आखाड्यांचे संत-महंत, तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आध्यात्मिक परंपरेच्या साक्षीने उभारला जाणारा हा धर्मध्वज आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाची नांदी ठरत असल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# वॉटर स्पोर्ट्समध्ये नाशिकची मान उंचावली!

## वैष्णवी काजळे ठरली राष्ट्रीय विजेती; आता युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये करणार भारताचे प्रतिनिधित्व

**नाशिक |**



नाशिकच्या मातीतील आणि जलक्रीडा (वॉटर स्पोर्ट्स) क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या युवा खेळाडू वैष्णवी काजळे हिने पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर नाशिकचे नाव अभिमानाने उंचावले आहे. मुंबईतील मार्वे बीच येथे पार पडलेल्या YAI Youth National Championship 2026 स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत तिने राष्ट्रीय विजेतेपदावर मोहोर उमटवली.

अवघ्या 13 व्या वर्षी राष्ट्रीय आणि आशियाई स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करणारी वैष्णवी आता युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज झाली असून, तिच्या दैदिप्यमान कामगिरीमुळे नाशिकसह Championship 2026 स्पर्धेत देशभरातील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत वैष्णवी काजळे हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आणि राष्ट्रीय विजेतेपदावर आपले नाव कोरले.

वैष्णवीने यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. थायलंड येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत तिने सुवर्णपदक आणि कांस्यपदक जिंकत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला होता. तसेच ती आशियाई विजेती म्हणूनही ओळखली जाते. अमेय हुमनाबादकर यांच्या मार्गदर्शनाखाली ती आपले कौशल्य घेत असून, कमांडिंग जिद्दीच्या बळावर तिने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर यशाची मालिका कायम ठेवली आहे.

राष्ट्रीय आणि आशियाई स्तरावरील यशानंतर आता तिची निवड युरोपमधील पोलंड येथे होणाऱ्या European Championship साठी झाली आहे. या स्पर्धेत ती भारताचे प्रतिनिधित्व करणार असून तिच्याकडून आणखी एका ऐतिहासिक कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अशोक खरात प्रकरणात सरकारचा मोठा निर्णय

## उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

महिलांचे कथित लैंगिक शोषण, फसवणूक तसेच अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात महाराष्ट्र सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या बहुचर्चित प्रकरणाची बाजू न्यायालयात प्रभावीपणे मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ Ujjwal Nikam यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या या हाय-प्रोफाईल प्रकरणात निकम यांच्या नियुक्तीमुळे कायदेशीर प्रक्रियेला



नवे वळण मिळणार असल्याचे मानले जात आहे.सरकारतर्फे या खटल्याचे प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारीत्यांच्याकडे सोपविण्यात आल्याने राजकीय तसेच प्रशासकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

Prevention and Eradication of Human Sacrifice and other Inhuman, Evil and दरम्यान, अशोक खरात यांच्याविरोधात लैंगिक छळ, फसवणूक आणि Maharashtra Aghori Practices and Black Magic Act अंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या आरोपांची चौकशी सुरू असून संबंधित यंत्रणा प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

या प्रकरणात उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीमुळे न्यायालयीन सुनावणी आणि पुढील घडामोडींवर राज्याचे लक्ष लागले आहे.



## अशोक खरात प्रकरणात सरकारची नवी रणनीती; उज्ज्वल निकम यांच्यासोबत 'नगरी' वकील परिमल फळे मैदानात

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातील न्यायालयीन लढाई अधिक भक्कम करण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांच्या टीममध्ये आता अहिल्यानगरचे अनुभवी फौजदारी वकील ॲड. परिमल फळे यांची सहायक विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विधी व न्याय विभागाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली असून, अशोक खरातविरोधातील खटल्यात सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्याची जबाबदारी आता निकम-फळे या अनुभवी जोडीवर असणार आहे.

राहुरीतील आढाव वकील दाम्पत्य हत्या प्रकरण, ॲड. रियाज पठाण हत्या प्रकरण, रेखा जरे खून प्रकरण यांसारख्या गाजलेल्या खटल्यांमध्ये ॲड. परिमल फळे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यामुळे अशोक खरात प्रकरणातील पुढील सुनावणी अधिक चर्चेची ठरणार असल्याचे मानले जात आहे.



# रुग्णालयांच्या मनमानीला लगाम! औषधे कुठून घ्यायची याचा निर्णय रुग्णांचाच; तुकाराम मुंढे यांचा कडक इशारा

**रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांना संबंधित हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या व्यवस्थेविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कठोर भूमिका घेतली आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, औषधे कुठून खरेदी करावीत हा निर्णय पूर्णपणे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांचा असून, कोणतेही रुग्णालय त्यावर बंधने घालू शकत नाही.**

राज्यातील विविध भागांतून रुग्णालयांकडून अंतर्गत फार्मसीतूनच औषधे घेण्यास दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारी एफडीएकडे सातत्याने येत होत्या. या पार्श्वभूमीवर मुंढे यांनी पत्रकार परिषदेत महत्त्वपूर्ण आदेश जाहीर करत रुग्णांच्या अधिकारांबाबत स्पष्ट भूमिका मांडली.

त्यांनी सांगितले की, रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या प्रिस्क्रिप्शननुसार रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक कोणत्याही नोंदणीकृत मेडिकल स्टोअरमधून औषधे खरेदी करू शकतात. या प्रक्रियेत अडथळा आणणे किंवा स्वतःच्या मेडिकलमधूनच खरेदी करण्यासाठी दबाव निर्माण करणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही.अनेक खासगी रुग्णालयांमध्ये चालवल्या जाणाऱ्या अंतर्गत फार्मसींमधील औषधांचे दर बाहेरील बाजारपेठेपेक्षा जास्त असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या. त्यामुळे रुग्णांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची बाबही अधोरेखित झाली होती. नव्या निर्देशांमुळे अशा प्रकारच्या व्यवहारांवर नियंत्रण येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मुंढे यांनी डॉक्टरांनाही स्पष्ट सूचना दिल्या आहेत. रुग्णाला आवश्यक असलेल्या औषधांची यादी किंवा प्रिस्क्रिप्शन नातेवाइकांच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील. यामुळे रुग्णांना त्यांच्या सोयीनुसार आणि परवडणाऱ्या किमतीत औषधे उपलब्ध करून घेता येणार आहेत. आवश्यक ब्रँड उपलब्ध नसल्यास समतुल्य जेनेरिक औषधांचा पर्याय निवडण्याचाही अधिकार त्यांना राहणार आहे.



एफडीएचा हा आदेश केवळ मार्गदर्शक स्वरूपाचा नसून त्याची अंमलबजावणी अनिवार्य असल्याचेही मुंढे यांनी स्पष्ट केले. कोणतेही रुग्णालय नियमांचे उल्लंघन करत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी थेट अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

रुग्णांच्या निवडीच्या अधिकाराचे संरक्षण आणि आरोग्य व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्याच्या दृष्टीने एफडीएची ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे रुग्णालयांच्या एकाधिकारशाहीवर मर्यादा येण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक दिलासाही मिळण्याची शक्यता आहे.

# गुटखा माफियांना आता थेट 'मकोका'चा फास!

## FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांचा राज्यभरासाठी कडक आदेश

महाराष्ट्रातील गुटखा, तंबाखू आणि निकोटीनयुक्त पानमसाल्याच्या अवैध व्यापाराविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (FDA) अभूतपूर्व पाऊल उचलले आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देत अशा संघटित रॅकेट्सवर पात्र प्रकरणांमध्ये थेट महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) लागू करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा व्यापार अनेक ठिकाणी संघटित पद्धतीने सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे. केवळ किरकोळ विक्रेतेच नव्हे, तर उत्पादक, पुरवठादार, वाहतूकदार, गोदाम चालक आणि आर्थिक व्यवहार सांभाळणाऱ्या घटकांचे जाळे या व्यवसायामागे कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर मुंढे यांनी अशा कारवायांकडे केवळ अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन म्हणून न पाहता संघटित गुन्हेगारीच्या दृष्टीने तपास करण्याचे निर्देश दिले आहेत. वारंवार गुन्हे करणाऱ्या आणि आर्थिक फायद्यासाठी एकत्रितपणे कार्य करणाऱ्या टोळ्यांविरोधात मकोकाअंतर्गत कठोर कारवाईचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत असुरक्षित आणि प्रतिबंधित अन्नपदार्थांची निर्मिती, साठवणूक किंवा विक्री हा गंभीर गुन्हा मानला जातो. अशा गुन्ह्यांमध्ये दोषी आढळणाऱ्यांना कारावासाची शिक्षा होऊ शकते. पुनरावृत्ती झाल्यास शिक्षेची तीव्रता आणखी वाढू शकते.

नव्या निर्देशांनुसार, प्रत्येक धाड आणि तपासणीदरम्यान संबंधित प्रकरण मकोकासाठी पात्र आहे का, याची स्वतंत्र पडताळणी करावी लागणार आहे. आवश्यक निकष पूर्ण झाल्यास FDA आणि पोलीस विभागाच्या समन्वयातून पुढील कायदेशीर प्रक्रिया राबवली जाणार आहे.

# 'कॉकरोच' ते देशव्यापी आंदोलन!

## अभिजीत दिपके यांच्या एका हाकेने तरुणाई रस्त्यावर




देशातील शिक्षण व्यवस्था, स्पर्धा परीक्षांमधील गोंधळ आणि वाढती बेरोजगारी यांसारख्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेत चर्चेत आलेले कॉकरोच जनता पार्टी (CJP) चे संस्थापक अभिजीत दिपके हे सध्या तरुणाईच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहेत. सोशल मीडियापासून रस्त्यावरील आंदोलनापर्यंत पोहोचलेल्या त्यांच्या मोहिमेला देशभरातील विद्यार्थ्यांचा आणि युवकांचा वाढता प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

गेल्या काही महिन्यांपासून विविध स्पर्धा परीक्षा, पेपरफुटीच्या घटना आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवत दिपके यांनी युवकांशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच कॉकरोच जनता पार्टी या नव्या राजकीय व्यासपीठाची निर्मिती झाली. सुरुवातीला सोशल मीडिया मोहिम म्हणून ओळखली जाणारी ही चळवळ आता अनेक शहरांमध्ये प्रत्यक्ष आंदोलनाच्या स्वरूपात दिसू लागली आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनानंतर पुणे, मुंबई, जयपूर, लखनऊ आणि इतर शहरांमध्येही समर्थक रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, विद्यार्थ्यांना न्याय आणि शिक्षण क्षेत्रातील उत्तरदायित्व या प्रमुख मागण्यांमुळे या आंदोलनाला मोठी प्रसिद्धी मिळाली आहे.

अलीकडेच अभिजीत दिपके यांनी शिक्षण क्षेत्रातील सुधारणांवर आधारित स्वतंत्र 'एज्युकेशन मॅनिफेस्टो' जाहीर केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केवळ आंदोलन न करता पर्यायी धोरणे मांडण्याचाही प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यामुळे त्यांच्या भूमिकेकडे राजकीय विश्लेषकांचेही लक्ष वेधले गेले आहे. सामाजिक माध्यमांवरील लोकप्रियता, युवकांशी असलेला थेट संवाद आणि शिक्षणासारख्या संवेदनशील विषयावर सातत्याने सुरु असलेली भूमिका यामुळे अभिजीत दिपके हे नाव आता राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आले आहे. आगामी काळात ही चळवळ केवळ आंदोलन म्हणून राहते की मोठ्या राजकीय पर्यायात रूपांतरित होते, याकडे देशभरातील युवकांचे लक्ष लागले आहे.



# नाशिकमध्ये भूखंड घोटाळ्याचा पर्दाफाश; दोन वकिलांसह १४ जण जाळ्यात



नाशिक शहरात बनावट कागदपत्रे आणि खोट्या ओळखींचा वापर करून भूखंड व्यवहारांमध्ये कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा इंदिरानगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

या प्रकरणात दोन वकिलांसह एकूण १४ आरोपींना अटक करण्यात आली असून, या कारवाईमुळे शहरातील भूखंड व्यवहारांमधील मोठे रॅकेट उघडकीस आले आहे.

पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी जमीनमालकांच्या नावाशी साधर्म्य असलेल्या व्यक्तींना पुढे करून त्यांची बनावट ओळख निर्माण करत होते. त्यासाठी आधारकार्डसह विविध कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात येत होता. त्यानंतर खोटी बँक खाती उघडून व्यवहारांची साखळी उभी केली जात होती.

या संपूर्ण कटात काही कायदेशीर कागदपत्रांचाही गैरवापर करण्यात आल्याचे उघड झाले आहे. आरोपींनी शासनाच्या नाव बदलासंबंधीच्या राजपत्राच्या बनावट प्रती तयार करून त्यांचा वापर भूखंड व्यवहारांसाठी केला. परिणामी मूळ मालकांना कोणतीही माहिती न देता त्यांच्या मालमत्तेची विक्री केल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, या गुन्ह्यातील फरार असलेल्या दोन वकिलांना गुन्हेशोध पथकाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथून अटक केली. प्राथमिक तपासात या टोळीने नाशिक शहरात अशाच प्रकारचे किमान पाच व्यवहार केल्याची माहिती समोर आली असून, त्यामध्ये मोठ्या आर्थिक फसवणुकीचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशोध पथकाकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# नाशिकमध्ये विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीची महत्त्वपूर्ण बैठक

नाशिक येथे आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. निवडणुकीची रणनीती, संघटनात्मक तयारी तसेच स्थानिक पातळीवरील समन्वय याबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीस मंत्री दादा भुसे, मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, आमदार राहुल ढिकले, आमदार नितीन पवार यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# "बांगड्या भरलेल्या नाहीत!" जैन धर्मगुरूंचा संताप; संदीप देशपांडेंना थेट आव्हान

मुंबई : पांढऱ्या पट्ट्यांच्या वादाने आता नवे वळण घेतले असून जैन समाजाचे धर्मगुरू निलेश चंद्र मुनी यांनी मनसे नेते संदीप देशपांडे यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे. "जैन समाज शांतीप्रिय असला तरी आम्ही हातात बांगड्या भरलेल्या नाहीत, वेळ आल्यास योग्य उत्तर दिले जाईल," असा इशारा त्यांनी दिला.



विद्याविहार येथील जैन मंदिर परिसरात रस्त्यावर आखण्यात आलेल्या पांढऱ्या पट्ट्यांवरून सुरू झालेला वाद आता दादरपर्यंत पोहोचला आहे. दादरच्या गोखले मार्गावरही अशाच प्रकारच्या पट्ट्या आढळल्यानंतर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला त्या हटवण्याचा अल्टिमेटम दिला होता.

यावर प्रतिक्रिया देताना निलेश चंद्र मुनी म्हणाले की, कोणत्याही धर्माचा अपमान करणे किंवा दोन समाजांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करणे चुकीचे आहे. पांढरा रंग हा शांततेचे प्रतीक असून त्याचा वेगळा अर्थ काढला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

संदीप देशपांडे यांच्यावर टीका करताना त्यांनी, "खरंच विरोध करायचा असेल तर इतर ठिकाणीही अशा प्रथा आणि व्यवस्था दिसतात, त्याविरोधात भूमिका घ्या. केवळ जैन समाजाला लक्ष्य करून वातावरण बिघडवू नका," असे आव्हान दिले.

दरम्यान, देशपांडे यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर प्रशासनाने संबंधित पांढऱ्या पट्ट्या हटवण्याची कार्यवाही सुरू केली आहे. मात्र या संपूर्ण प्रकरणामुळे धार्मिक भावना, सार्वजनिक रस्ते आणि प्रशासनाची भूमिका यावरून नवा राजकीय वाद रंगण्याची चिन्हे दिसत आहेत.

# प्रणित मोरे प्रकरणाला नवे वळण; गृह विभागाकडून सर्व व्हिडिओंच्या चौकशीचे आदेश

स्टँडअप कॉमेडियन प्रणित मोरे याच्या कार्यक्रमांमधील कथित आक्षेपार्ह आणि अश्लील आशयावरून निर्माण झालेला वाद आता अधिक गंभीर बनला असून राज्याच्या गृह विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे, केवळ अलीकडे चर्चेत आलेले दोन व्हिडिओच नव्हे, तर यापूर्वीच्या सर्व कार्यक्रमांतील सामग्रीचीही तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

राज्याचे गृह विभाग राज्यमंत्री पंकज भोयर यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देताना समाजात विकृत आणि आक्षेपार्ह विनोदांना स्थान नसल्याचे स्पष्ट केले. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या काही व्हिडिओंमध्ये एका डॉक्टरने मृतदेहाबाबत केलेल्या वक्तव्यावरून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला होता. यानंतर विविध स्तरांवरून कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायबर पोलिसांकडून प्रणित मोरे याने अपलोड केलेल्या तसेच कार्यक्रमांमधील उपलब्ध व्हिडिओ कंटेंटची सखोल चौकशी केली जाणार आहे. याप्रकरणी महाराष्ट्र राज्य महिला आयोगानेही नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित महिला डॉक्टरच्या भूमिकेचीही चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

पंकज भोयर यांनी म्हटले की, समाजासाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या विषयांवर भाष्य होणे अपेक्षित असताना अशा प्रकारची वक्तव्ये निंदनीय आहेत. देहदानासारख्या संवेदनशील विषयांबाबतही जर आक्षेपार्ह भाष्य होत असेल, तर त्याची गांभीर्याने दखल घेतली जाईल.



दरम्यान, वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर प्रणित मोरे याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत संबंधित वक्तव्यांबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे. आपल्या भावना दुखावण्याचा हेतू नसल्याचे सांगत त्याने माफी मागितली आहे. मात्र, या माफीनाम्यानंतरही चौकशीची प्रक्रिया सुरूच राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

प्रणित मोरे यांच्या कार्यक्रमांवरील आशयामुळे यापूर्वीही अनेकदा वाद निर्माण झाले होते. मात्र यावेळी गृह विभाग, महिला आयोग आणि सायबर यंत्रणा एकाच वेळी सक्रिय झाल्याने हे प्रकरण अधिक गंभीर टप्प्यात पोहोचल्याचे मानले जात आहे.


## जाहिरात

**जाहिराती, शुभेच्छा संदेश, निविदा व प्रसिद्धीसाठी संपर्क करा.**

डिजिटल पोर्टल | सोशल मीडिया | वृत्तपत्र

जाहिराती, बातम्या व प्रसिद्धीसाठी MHDU News शी संपर्क साधा. आपल्या माहितीचे डिजिटल पोर्टल, सोशल मीडिया व वृत्तपत्राद्वारे प्रसारण केले जाते.

संपर्क : ८०५५५०५१६१/८०५५५०५००६